नि.फौ.के. नं. ६१/२०२४
महाराष्ट्र शासन वि. अविनाश
निशाण क्र. २५

<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०३ चा जबाब शपथेवर सुरु.</u>

**नाव** – सुनिता सुरेश भेरे,

**वय –** ७१ वर्षे, **व्यवसाय** – गृहिणी,

**राहणार –** बोंडये, भेरेवाडी, ता. संगमेश्वर जि. रत्नागिरी.

<u>अभियोगपक्षातर्फे सरतपास विशेष सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती गुरुपादगोळ यांचेकडून</u> –

०१. दिनांक १३/०५/२०२४ रोजी मी माझ्या घरी हजर होते. त्यादिवशी आमच्या वाडीमध्ये भांडणे झाली होती. असे काही घडले नाही की, मी सदर भांडण सोडविण्यासाठी गेले होते व त्यामध्ये माझे सोन्याचे मंगळसुत्र गहाळ झाले होते. त्यानंतर पोलीसांनी माझ्याकडे चौकशी करुन माझे तपासटिपण नोंदविले होते. मी आरोपीला ओळखते. तो माझ्या गावचा रहीवाशी आहे.

***(साक्षीदार पूर्वीच्या जबानीशी विसंगत साक्ष देत असल्याने विशेष सहा. सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उलटतपासाच्या स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली, परवानगी मंजूर.)***

०२. *(साक्षीदारास तिच्या **<u>तपासटिपणातील चिन्हांकित 'अ' कडील मजकुर</u>** वाचुन दाखविण्यात आला)*. सदरचा मजकुर बरोबर नाही. सदरचा मजकुर तसा का नमुद करण्यात आला आहे, हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, न्यायालयाबाहेर तडजोड होवुन आरोपीसोबतचा वाद आता मिटलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, तडजोड झाल्यामुळे आरोपीला वाचविण्यासाठी आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे. आरोपीला दाखविल्यास ओळखु शकते. आज रोजी आरोपी न्यायालयात हजर नाही.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास – आरोपीतर्फे विद्वान विधीज्ञा श्रीमती यु. पी. चव्हाण यांनी नाकारला.</u>**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

ROHINI RAJENDRA KULKARNI

Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2026.03.11 14:47:17 +0530

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**

दिनांक १०.०३.२०२६ — न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख,

स्थळः देवरुख — जि. रत्नागिरी.

-:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date of decision | :- | 10/03/2026 |
| Evidence signed by PO. on | :- | 10/03/2026 |
| Evidence uploaded on | :- | 10/03/2026 |